पुण्यनगरी

# दुबईत रंगणार भारताची पहिली ग्लोबल समीट

**मुंबई ।** कौन्सिल ऑफ इंडियन एक्झिबिशन ऑर्गनायझर्स (सीआयईओ) या प्रदर्शन आणि परिषद आयोजकांच्या संस्थेच्या वतीने २५ आणि २६ जानेवारी २०२२ रोजी प्रदर्शन उद्योगासाठी दुबई येथे भारताची पहिली ग्लोबल समीट २०२२ आयोजित केली आहे. याबाबत इंडिया आयटीएमई सोसायटीच्या कार्यकारी संचालक सीआयईओच्या सुकाणू समिती सदस्य सीमा श्रीवास्तव म्हणाले की, भारतीय प्रदर्शन उद्योग आयोजक आणि सेवा प्रदात्यांनी जगाला त्यांची ताकद आणि क्षमता दाखवण्याची ही संधी गमावू नये. भारत, यूएई, केएसए, ओमान, कतार, तुर्की, इराण, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, थायलंड, मलेशिया, सिंगापूर, इंडोनेशिया, यूके, इस्रायल, इराक, इटली, फ्रान्स, रशिया, अमेरिका, चीन आणि जर्मनी या देशांतील उच्च-प्रोफाइल मान्यवर त्यांच्या सहभागाची पुष्टी केली. यामुळे उद्योग सदस्यांना जागतिक युती, भागीदारी जोडण्याची आणि नवीन बाजारपेठा एक्सप्लोर करण्याची महामारीनंतरची अनोखी संधी मिळत आहे.